महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ ०२ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १२७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209



लक्षवेधी



## मालगाडीच्या इंजिनात बिघाड

### शेलू - वांगणी दरम्यान रेल्वेसेवा उशिराने

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर:** शेलू ते वांगणी या रेल्वे स्थानकादरम्यान मालगाडीच्या इंजिनात बिघाड झाल्याने कर्जत मुंबई या रेल्वेसेवेला फटका बसला. सकाळी आठच्या सुमारास शेलूपुढे मालगाडीच्या इंजिनात बिघाड झाला. त्यामागून जाणाऱ्या कर्जत मुंबई लोकलसेवाचा खोळंबा झाला. त्यामुळे प्रवासी अडकून पडले. त्यानंतर इतर लोकल गाड्यांनाही याचा फटका बसला. त्यामुळे प्रवाशांत संतापाचे वातावरण होते. कोणत्या ना कोणत्या कारणाने दररोज मध्य रेल्वेची लोकल सेवा विलंबाने सुरू असते. शुक्रवारी कर्जत मुंबई मार्गावर एका मालगाडीच्या इंजिनात बिघाड झाल्याने शेलु स्थानकापुढे ही मालगाडी ठप्प झाली. त्यामुळे त्या मागून येणाऱ्या लोकल गाड्यांना त्याचा फटका बसला. ७वाजून ५२ मिनिटांनी कर्जत स्थानकातून मुंबईकडे जाणाऱ्या लोकल गाडीला याचा सर्वाधिक फटका बसला. ही मुंबई लोकल शेलू स्थानकाच्या पुढे जाऊन अडकली. सुमारे अर्धा ते पाऊण तास ही लोकल खोळंबल्याने लोकलमध्ये प्रवासी अडकून पडले. यादरम्यान बिघड झालेले मालगाडीचे इंजिन बदलण्यासाठी रेल्वेचे प्रयत्न सुरू होते. मात्र तोपर्यंत अर्धा ते पाऊण तास निघून गेला होता. या मालगाडीच्या इंजिनामुळे कर्जतहून मुंबईकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली होती. बदलापूर रेल्वे स्थानकातून मुंबईकडे जाणाऱ्या लोकल सुरू होत्या. मात्र कर्जत, भिवपुरी, शेलू, वांगणी या स्थानकातून मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांचा खोळंबा झाला.

## ठाणे मनोरुग्णालयात 'एमएस्सी इन मेंटल हेल्थ' अभ्यासक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** बदलत्या जीवनशैलीमुळे नागरिकांचे मानसिक आरोग्य ढासळत असून, नैराश्यामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे आरोग्य क्षेत्रामधील तज्ज्ञ व कुशल परिचारिकांची आवश्यकता निर्माण होत आहे. त्यामुळे ठाणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयामध्ये 'एम. एस्सी नर्सिंग इन मेंटल हेल्थ हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. हा अभ्यासक्रम सुरू करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली असून, आवश्यक परवानगी व मनुष्यबळाची भरती केल्यानंतर पुढील वर्षीपासून हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. राज्यामध्ये मानसिक आरोग्यासंदर्भातील परिचारिकांनाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था नाहीत. त्यामुळे परिचारिकांना बंगळुरूमध्ये प्रशिक्षणासाठी जावे लागत होते. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रादेशिक मनोरुग्णालयातील शिक्षणसंस्था सक्षम करण्याबाबत आरोग्य विभागाला पत्र लिहिले होते. त्यानुसार राज्य सरकारने तीन वर्षांपूर्वी ठाणे मनोरुग्णालयामध्ये डिप्लोमा इन मेंटल हेल्थ हा परिचारिका अभ्यासक्रम सुरू केल्यानंतर आता पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

## प्रतिबंधित कोरेक्स सिरपच्या ४०० बातल्यांसह एकाला घेतले ताब्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण शहरात पोलिसांनी शनिवारी महत्त्वपूर्ण कारवाई करत छापा टाकला आणि त्यात प्रचंड प्रमाणात अंमली (मादक) कोरेक्स सिरपचा साठा हस्तगत केला. ही धडक कारवाई बाजारपेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत केली. उप आयुक्त परिमंडळ 3 यांचे विशेष कारवाई पथक सपोनी अनिल गायकवाड व त्यांचे पथक हे बाजारपेठ पोलीस ठाणे हद्दीत अमली पदार्थ विरोधी कारवाई कामी गस्तीवर असताना एपीएमसी मार्केटजवळ, फोर्टिस हॉस्पिटलच्या नजीक, एका व्यक्तीला मोटरसायकलवर संशयास्पद स्थितीत काही वस्तू घेऊन जाताना पाहिले. संशयावरून त्याला थांबवून त्याची तपासणी केली असता, त्याच्याजवळ कोरेक्स सिरपच्या ४०० बाटल्या आढळून आल्या. पोलिसांनी घटनास्थळीच पाच पंचांच्या उपस्थितीत जप्तीची कारवाई पूर्ण केली. अटक केलेल्या व्यक्तीची नाव मोहम्मद मेहताब अनीस (वय ३३), असून टो कल्याण येथे राहणारा आहे. आरोपीला प्रतिबंधित सिरपसह ताब्यात घेऊन बाजारपेठ पोलीस स्टेशनमध्ये आणण्यात आले. त्याच्याविरुद्ध एनडीपीएस (NDPS) कायद्याचे कलम ८(क) आणि २२(ख) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मतचोरीवर ठाकरे बंधूंचा 'एल्गार' भाजपाचाही जोरदार 'पलटवार'











"मतदार यादीत मोठा घोळ असून त्या माध्यमातून मतचोरी झाल्याचा आरोप करत मनसे आणि महाविकास आघाडीने मुंबईत मोठा मोर्चा काढला. या मोर्चावर भाजपचे नेते आणि राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी टीका केली. दुबार मतदारयादीचा विषय हा गेल्या 25 वर्षांपासूनचा आहे, संपूर्ण यादी स्क्रॅप होणार नाही तोपर्यंत दुबार मतदान कमी होणार नाही. पुढच्या काळात घरोघरी जाऊन संपूर्ण मतदार यादी बनवली पाहिजे असं ते म्हणाले. लोकसभेच्या यादीवरच विधानसभा निवडणुका होतात आणि विधानसभा निवडणुकीच्या यादीवर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होतात. मात्र महाविकास आघाडीला माहीत आहे की त्यांचा पराभव निश्चित आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी केलेली ही धडपड आहे असा टोलाही बावनकुळे यांनी लगावला. , "दुबार तिबार मतदारांवर भाजपचे देखील ऑब्जेक्शन आहे. यावर सर्वात आधी देवेंद्र फडणवीसांनी आक्षेप घेत न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. त्यामुळे येणाऱ्या पुढच्या काळात घरोघरी जाऊन संपूर्ण मतदार यादी बनवली पाहिजे. दुबार मतदार यादी ही आजपासून नाही, तर गेल्या 25 वर्षांपासून आहे. दुबार मतदार यादीवर तुमची लोकसभा झाली, तुमची विधानसभा झाली. जोपर्यंत संपूर्ण यादी स्क्रॅप होणार नाही तोपर्यंत दुबार मतदार कमी होणार नाही. ॲडिशन आणि डिलिशनचा विषय वेगळा आहे. मात्र हा मोर्चा खोटारड्या लोकांचा आह. या लोकांचा पुन्हा पराभव होईल. त्यावेळी पराभव मतदार यादीमुळेच झाला हे सांगण्यासाठीच हा मोर्चा काढण्यात आला होता."



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

देशात बिहार विधानसभेच्या निवडणुका आणि महाराष्ट्रातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर मतचोरीचा मुद्दा पेटला आहे. थेट निवडणूक आयोगाच्या कार्यपध्दतीवरच प्रश्नचिन्हे उपस्थित करत विरोधकांनी त्यातही उद्धव आणि राज या ठाकरे बंधूंनी आता रान पेटवलं आहे. याच पार्श्वभूमीवर आता विधानसभेच्या निवडणुकीनंतर पहिल्यांदाच एकत्र दिसलेल्या महाविकास आघाडीनं 'सत्याचा मोर्चा' काढत निवडणूक आयोगावर निशाणा साधतानाच मुंबई महापालिका आणि इतर स्थानिकच्या निवडणुका भाजपसह महायुतीला सोप्या नसणार हेच दाखवून दिलं.

"सत्याचा मोर्चावर भाजपकडून आणि तीही थेट प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचीच प्रतिक्रिया समोर आली आहे. महाविकास आघाडीतील काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांसह मनसेनं मुंबईत शनिवारी (ता.1 नोव्हेंबर) सत्याचा मोर्चा काढण्यात आला. विरोधकांच्या या मोर्चावर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी जोरदार हल्ला चढवला. तसेच भाजपच्या कार्यकर्त्यांना हा विरोधकांचा हा कट उधळून लावा अशा सूचनाही केल्या.



## कार्तिकी एकादशीनिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पांडुरंगाची शासकीय महापूजा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कार्तिकी एकादशीला कार्तिकी यात्रा होत आहे. या दिवशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मानाचे वारकरी यांच्या शुभहस्ते सपत्नीक श्रींची शासकीय महापूजा पहाटे 2 वाजता होणार आहे. या यात्रेला सुमारे 10 ते 12 लाख भविक पंढरपुरात येतात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुविधा मंदिर समितीच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. पंढरपुरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी दर्शन रांगेत बॅरीकेटींग करून त्यावर वॉटरप्रुफ ताडपत्री शेड, जादा दर्शन मंडपाची निर्मिती, आपत्कालीन मार्ग, विश्रांती कक्ष, दर्शन रांगेत बसण्याची सुविधा करण्यात आली आहे. तसंच लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल वॉटर, चहा आणि खिचडीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीनं वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.



## अधिकाऱ्यांची बदली होताच बेकायदा बांधकामांना उधाण

> पदभार स्वीकारल्यानंतर आलेल्या दिवाळी सुट्ट्या, त्यानंतर मतदार याद्यांची कामे आणि इतर प्रशासकीय कामांमुळे प्रभागात लक्ष देता आले नाही. पण, प्रभागातील सुरू झालेली सर्व बेकायदा बांधकामे जमीनदोस्त केली जातील.
>
> - जयवंत चौधरी, साहाय्यक आयुक्त, अ प्रभाग.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण -** कल्याण डोंबिवली पालिकेच्या टिटवाळा अ प्रभागातील जबाबदार अधिकारी बदली होताच महिनाभरापासून टिटवाळा परिसरात वर्षभर रोखलेली बेकायदा बांधकामे आता दिवस, रात्र भूमाफियांनी सुरू केली आहेत. नवीन जबाबदार अधिकाऱ्याचा या बेकायदा बांधकामे आणि फेरीवाल्यांवर कोणताही वचक राहिला नसल्याची चर्चा टिटवाळा परिसरातील नागरिकांमध्ये सुरू आहे. मागील वर्षभर पूर्णपणे थांबविण्यात आलेली बेकायदा बांधकामे आता नव्याने सुरू झाल्याने टिटवाळा, मांडा, मोहने, आंबिवली, शहाड, वडवली, बनेली, बल्याणी, नांदप रस्ता, वासुंद्री रस्ता भागातील रहिवासी पान ३ वर ▶▶▶

## स्थानिक निवडणूक कामाला लागा

### - आ. किसन कथोरे यांचे कार्यकर्त्यांना निर्देश





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका कधी लागू शकतात तेव्हा कार्यकर्तांनी आळस झटकुन कामाला लागावे असे आवाहन सासणे येथे झालेल्या शिरवली व डोंगरन्हावे जिल्हा परिषद कार्यकर्ता आढावा बैठकीत केले. यावेळी त्यांनी अनेक मुद्द्यांवर भाष्य केले.**

मागिल विधानसभा निवडणूकीत काही भावनीक मुद्दे पुढे आल्याने मुरबाड मध्ये आपल्याला अपेक्षित मताधिक्य मिळाले नसले तरी येणाऱ्या निवडणुका या कार्यकर्ताच्या आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समीती ही आपलीच आहे. यावेळी पुढे बोलताना मला टाटा, बिर्ला व्हायचे नाही व माझ्या घरात कोणीही ठेकेदार नाही. मी तुमच्यासाठी तडजोड करायला तयार झालोय तशी मला गरज नाही. पण गद्दारी करणाऱ्यांना माफी नाही अशा शब्दात गद्दारांचा समाचार घेतला. विधानसभेला ज्यांनी काम केले नाही त्यांचे चेहरे मला माहित आहेत पण मी चुकुनही कोणाला बोललो नाही. अपुर्ण असलेली कामे पुर्ण करा व जनतेला विश्वास द्या असे आवाहन यावेळी त्यांनी उपस्थित कार्यकर्तांना केले. यावेळी उल्हास बांगर, गणेश कथोरे, सुरेश बांगर, स्वरा चौधरी, बाळा घरत, दिनेश उघडे, ज्योती गोडांबे यांनीही मार्गदर्शन केले. तर या बैठकीला भाजपा तालुकाअध्यक्ष दिपक पवार, जितेंद्र भावार्थे,अनिल घरत,जयवंत कराळे, मिलींद मडके,जाफरभाई शेख,आण्णा साळवे, सरपंच सौ.रेश्मा घरत, सौ. खरे,जनार्दन पादीर, दत्तात्रय डोंगरे, तानाजी घागस, नरेश मोरे,यांच्यासह डोंगरन्हावे, शिरवली गटातील कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन न्हावे सरपंच जगदिश हिंदूराव यांनी केले होते तर सूत्रसंचालन सुभाष देसले यांनी केले.

## खडसेंच्या बंगल्यातील चोरीचे थेट उल्हासनगर कनेक्शन ?





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) ज्येष्ठ नेते आणि आमदार एकनाथराव खडसे यांच्या जळगावातील आलिशान बंगल्यात झालेल्या चोरी प्रकरणात आता उल्हासनगर कनेक्शन उघड झाले आहे.

या प्रकरणातील संशयित उल्हासनगरातील दोन सख्खे सराईत गुन्हेगार भाऊ असल्याचे समोर आले असून, त्यांच्या शोधासाठी जळगाव पोलिसांचे विशेष पथक बुधवारी मध्यरात्री उल्हासनगरात दाखल झाले होते. जळगावातील शिवराम नगर येथील खडसे यांच्या बंगल्यातील चोरीनंतर केवळ दोन दिवसांतच तपास नव्या दिशेने वळला आहे. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे जळगाव पोलिसांनी विठ्ठलवाडी पोलिसांसह संयुक्त मोहीम राबवून संशयितांचा शोध सुरू केला आहे.

उल्हासनगरमध्ये सर्च ऑपरेशन तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाईल लोकेशनच्या आधारे तपासात संशयित आरोपी उल्हासनगरातील विठ्ठलवाडी परिसरात राहत असल्याची माहिती मिळाल्यानंतर, जळगाव पोलिसांचे पथक बुधवारी मध्यरात्री उल्हासनगरात दाखल झाले. रात्री उशिरापर्यंत संयुक्त शोधमोहीम आणि सर्च ऑपरेशन राबवण्यात आले, ज्यामुळे उल्हासनगरातही खळबळ उडाली आहे. सध्या काही संशयितांची चौकशी सुरू असून, पोलीस "सर्व शक्यता तपासात घेत आहेत. आरोपींचा लवकरच पर्दाफाश होईल," असे अधिकृत सूत्रांनी सांगितले. या प्रकरणात चोरीमागे राजकीय हेतू आहे की फक्त आर्थिक स्वार्थ, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल. मात्र उल्हासनगरचा धागा समोर आल्यानंतर ही चोरी आता राज्यस्तरीय चर्चेचा विषय ठरली आहे.

### दागिन्यांपेक्षा दस्तावेजांचा शोध !

**दोन दिवसांपूर्वी झालेल्या या चोरीत सात ते आठ तोळे सोनं आणि सुमारे ३५ हजार रुपये रोख रक्कम चोरीला गेली. मात्र तपासात हे प्रकरण केवळ भुरट्या चोरीपुरते मर्यादित नसल्याचे स्पष्ट झाले आहे. चोरट्यांनी घरातील विशिष्ट कपाटांतील फाइल्स, सीडीज आणि पेन ड्राइव्हच नेमके लक्ष्य केले, यामुळे हेतूबाबत संशय निर्माण झाला आहे. चोरी केवळ मालमत्तेच्या लालसेसाठी नसून, महत्त्वाची माहिती हस्तगत करण्याच्या उद्देशाने झाली असावी, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.**







## वाचक मनोगत

# शेतीचा श्वास गुदमरतोय



सध्याची हवामानाची अनिश्चितता,परतीच्या पावसाचा बदलेला वेळापत्रक यामुळे संपूर्ण भात पिकाचे सर्वत्र अतोनात नुकसान झाले आहे. सिंचनाचे पाणी म्हणजेच उन्हाळी पीक हाच शेतकऱ्यांसाठी एकमेव आधार उरला आहे....आणि तोच चिरंतन राहील अशी आशा पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी व्यक्त केली आहे.

आजचा शेतकरी हा पावसाच्या दयेवर नाहीतर तर अनिश्चिततेच्या फेऱ्यात जगतो आहे. कधी आकाशात ढग असून पाऊस नाही,तर कधी मुसळधार तर कधी ढगफुटी सदृश्य पाऊस पडून सर्वच पिकांचा नाश करतो आहे.या बदलत्या वातावरणात शेती आणि शेतकरी टिकवायचा असेल तर सिंचनाचे पाणी हाच एकमेव श्वास आहे..

खारेपाटाच्या भागात खाड्या, खैसे ,यातील खाऱ्या पाण्याचे रूपांतर गोड्या पाण्यात होईल.पाणी हेच जीवन.मात्र बऱ्याच ठिकाणी सरकारी योजना कागदावरच रखडल्या आहेत. शेतकऱ्यांच्या घामाला पाण्याची साथ मिळाली नाही तर त्यांची मेहनत घाम व्यर्थ जाईल अशी खंतही व्यक्त केली

उन्हाळी पीक भाजीपाला ,फळे ,फुलकोबी,फुले,हे पीक घ्यायचे असेल तर सिंचनाचे पाणी याला वरदान ठरेल.

दिवसेंदिवस पाण्याची घसरणारी पातळी, नद्या प्रदूषित होणे,यावर उपाय म्हणून शेततळी अद्यावत ठेवणे, साठ वण टाक्या,आणि बंधारे यावर गंभीर विचार होऊन सिंचनाच्या पाण्याचा योग्य वापर होईल. सरकारने,प्रशासनाने ही सिंचनाची पाटी पुढे सरकवली पाहिजे .प्रत्येक शेतकऱ्याने, गावाने, स्थानिक स्वराज्य संस्थेने पाणी स्वावलंबन ही चळवळ स्वीकारली पाहिजे.आजच्या बदलत्या हवामानावर सिंचनाचे पाणी हाच उपाय शेतकरी ,शेती टिकली पाहिजे तर अन्न सुरक्षा,अन्न नियोजन बिघडणार नाही.धान्याचे उत्पादन झाले नाहीतर आपल्या ताटात काय,असा प्रश्न निर्माण होईल.यासाठी पाण्याचं थेंब महत्वाचा आहे.

खारेपाट विभागात दोन उपोषणे होऊन तब्बल ७६६ कोटीची निधी मंजूर केली गेली.पहा भविष्यातील आजच्या प्रश्नाची उकल या आंदोलनात दिसून येते.हीच खरी दूरदृष्टी.या निधीचा योग्य सदुपयोग झाला तर आजची दुष्काळी परिस्थिती यावर उन्हाळी पीक नक्कीच मात करेल.आज जे बियाणे, खते, मजुरी,याचा खर्च सिंचनाचे पाणी भरून काढेल...पाहूया सरकार ,प्रशासन ,लोकप्रतिनिधी यांची सकारात्मक भूमिका कोणती असेल कालाय तस्मै नमः असेही सी.आर.म्हात्रे यांनी सांगितले

\- सी.आर.म्हात्रे

# पाऊस दादा, शेतकऱ्यांवर राग काढू नको....

## मुरबाडी बोली भाषेतून नंदू शिंदे यांनी मांडली शेतकऱ्यांची व्यथा!



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुरबाड-प्रतिनिधी (दिलीप पवार)**

"मीन्या फोन लावला होता उद्यापासून पाऊस नय परनार " हा व्हिडीओ सध्या सोशल मिडियावर प्रचंड गाजत आहे. मुरबाड तालुक्यातील शिरगाव येथिल प्रसिद्ध रांगोळी कलाकार नंदू शिंदे सध्या अस्सल मुरबाडी बोली भाषेत सामाजिक प्रश्न मांडत आहे. त्याला सोशल मिडियावर प्रचंड दाद सुद्धा मिळत आहे. पावसाने यावर्षी शेतीचे प्रचंड नुकसान केले असून शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. सात महिने होत आले तरी वरूणराजा अजूनही थांबण्याचे नाव घेत नाही. कापणीला आलेले भात शेतातच कुजून गेले आहे.

नंदू शिंदे यांनी हिच शेतकऱ्यांची व्यथा सोशल मिडियावर रिल्सच्या माध्यमातून मांडली आहे. पाऊस दादा तु गरिब शेतकऱ्यांवर का राग काढत आहे तुला रागच काढायचा असेल तर तो वाईट कर्म केलेल्यांवर काढ पण माझ्या शेतकऱ्यांवर काढु नकोस. याच बरोबर तुला मी तेलाची भाकर सुद्धा नैवेद्य म्हणून देईन पण बरसायचा थांब, उन्हाळ्याचे दोन महिने व हिवाळ्याचे दोन महिने तू घेतलेस तरी तुझी हौस झाली नाही का आता विश्रांती घे अशी विनवनी फोनद्वारे करत आपल्या रिल्सच्या माध्यमातून शेतकऱ्यांची व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला असून त्याला सोशल मिडियावर प्रचंड दाद मिळत असून त्याचे कौतुक होत आहे.




# समस्यांनी पोखरली पंचवटी एक्स्प्रेस

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

रेल्वेला घसघशीत महसूल देणाऱ्या, नाशिककरांसाठी अत्यंत महत्त्वाच्या व प्रतिष्ठेच्या असलेल्या मनमाड-नाशिक-मुंबई पंचवटी एक्स्प्रेसला काही दिवसांपासून विविध समस्यांनी ग्रासले आहे. याचा विपरीत परिणाम प्रवाशांवर होत आहे. विशेषकरून पासधारक प्रशासनाच्या या मनमानी व अनागोंदी कारभाराचे बळी ठरत आहे. बसण्यास जागा असूनही त्रासदायक कोचमुळे पासधारकांना चार ते पाच तास उभ्याने प्रवास करावा लागत आहे. नोकरी-व्यवसायानिमित्त रोज पहाटे उठून रात्री बाराला घरी परतणाऱ्या प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रशासनास वारंवार विनंती करूनही दुर्लक्ष केले जात असल्याने संताप व्यक्त होत आहे.

नाशिककरांसाठी सुरु केलेल्या पंचवटीसह अनेक रेल्वेगाड्या अन्य जिल्ह्यांसाठी पळविण्यात आल्या आहेत. तेव्हापासून रेल्वे प्रवाशांवर अन्याय सुरू आहे. नाशिककरांकडे लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष झाल्याची भावना प्रवाशांकडून व्यक्त होत आहे. पंचवटीतून नाशिक, मनमाड, इगतपुरी आदी ठिकाणाहून मोठ्या प्रमाणावर नोकरदार, व्यापारी, विद्यार्थी, रुग्ण मुंबईला अप-डाऊन करतात.

**मात्र, महत्त्वाचा दर्जा असूनही या गाडीच्या डब्यांमध्ये पाणी नसते. झुरळांचा मोठ्या प्रमाणात उपद्रव सहन करावा लागतो. डब्यांच्या चुकीच्या डिझाईनमुळे बसण्याची जागा व खिडकी यामधील तफावत त्रासदायक ठरत आहे. या समस्यांमुळे पंचवटी एक्स्प्रेसप्रेस सध्या प्रवासी व पासधारकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. पंचवटी एक्स्प्रेसमुळे रेल्वेला नियमितपणे चांगला महसूल मिळतो. मात्र, एक वर्षापासून या गाडीला दुय्यम दर्जा दिला जात आहे. ही गाडी मुंबईला दररोज मिनिटे उशिराने पोचत असल्याने अनेकांच्या नोकऱ्या जाण्याची वेळ आली आहे. प्रवासी वेल्फेअर असोसिएशनने संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट घेऊन विनंती पत्रे दिली. सोशल मीडियाच्या माध्यमातून तक्रारी केल्या. तरीदेखील प्रशासन पंचवटी एक्स्प्रेसच्या प्रवाशांच्या समस्यांकडे पूर्णतः दुर्लक्ष करत असल्याची तक्रार आहे. प्रवासी संघटनेच्या सूचनांकडे व विनंतीला केराची टोपली दाखवली जात आहे.**

### मुंबई पोहचण्यासाठी दररोज विलंब

**नाशिक- नाशिक जिल्ह्यातून मुंबई येथे नोकरी, व्यवसायानिमित्त दररोज रेल्वेने ये-जा करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या बससेवेव्दारे दररोज मुंबईला ये-जा करणे परवडणारे नसल्याने अशा मंडळींसाठी रेल्वे सोईस्कर ठरते. नाशिक जिल्ह्यातून मुंबईला जाणाऱ्या नोकरदार, व्यावसायिकांना मनमाड ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस पंचवटी एक्स्प्रेस ही गाडी जीवनवाहिनीसारखी झाली आहे. पंचवटी एक्स्प्रेस आणि नाशिक जिल्ह्यातून दररोज मुंबईला ये-जा करणाऱ्यांचे एक वेगळेच नाते तयार झाले आहे. परंतु, काही दिवसांपासून पंचवटी एक्स्प्रेसचा प्रवास समस्यांच्या गर्तेत सापडला आहे. मुंबई पोहचण्यासाठी दररोज होणारा विलंब, पंचवटीतील डब्यांमधील गैरसोयी यामुळे प्रवासी हैराण झाले आहेत.**

# भिवंडी महापालिकेचे 8 कर्मचारी सेवानिवृत्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (प्रतिनिधी)** भिवंडी शहर महानगर पालिकेच्या सेवेत काम करणाऱे आठ कर्मचारी नियमानुसार नियत वयोमाना नुसार सेवानिवृत्त झाले आहेत त्यामुळे महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून काल सायंकाळी पालिका सभागृहात उपाआयुक्तांच्या हस्ते त्यांचा सपत्नी सत्कार करण्यात आला. यावेळी पालिका कर्मचारी व

त्यांच्या परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१) प्रकाश गोपाळ काठवले,२) जगदिश जयराम तरे,३) शंकर कृष्णा लोहार ४) प्रकाश चंद्रय्या कदम ५) काळुबाई दुंधाराम धनगर ६) श्रीकांत विनायक वनगे, ७) गणेश मगन चौधरी, ८) सुधिर



काशिनाथ मोरे असे सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची नांवे आहेत. महापालिका आयुक्त अनमोल सागर यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगर पालिकेचे उपाआयुक्त शैलेश दोंदे यांच्या हस्ते सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सपत्नी शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी पालिकेचे जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी, भारतीय कामगार कर्मचारी महासंघ युनियन अध्यक्ष भानुदास भसाळे, सचिव

श्रीपत तांबे यांच्यासह विविध युनियन चे पदाधिकारी,सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा परिवार,पालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सुक्या मासळीचा हंगाम संकटात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**तुर्भे, ता. १ (बातमीदार)** : अवकाळी पावसाने बळीराजाबरोबर आता कोळीबांधवही संकटात सापडला आहे. वादळी वाऱ्यामुळे मच्छीमारीसाठी खोल समुद्रात जाणे धोक्याचे ठरत आहे. अशातच सुकलेल्या मासळीच्या विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नावरही गदा आल्याने हंगाम वाया जाण्याची भीती आहे.

वर्षभरापासून समुद्रातून मिळणाऱ्या मासळीची आवक घटली आहे. त्यापाठोपाठ अवकाळी हजेरी लावल्याने किनारपट्टीच्या भागात सुकविण्यासाठी ठेवलेली मासळी भिजून गेली आहे. त्यामुळे सुकी मासळी विक्रीच्या हंगामातच

> **सुक्या मासळीच्या हंगामाला अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. सुकविण्यासाठी ठेवलेले बोंबील, जवळा भिजून खराब झाला आहे. सुकवलेली सुकी मच्छी बाजारात येण्याआधीच नष्ट झाली आहे.**
> **- दीपाली गजणे, मासळी विक्रेत्या, दिवाळे कोळीवाडा**

लाखोंचे नुकसान झाले आहे. दसऱ्यानंतर पावसाचे प्रमाण कमी झाले की दारासमोरील अंगणात शिल्लक मच्छीचे वाळवण टाकले जाते. त्यात सुकट, जवळा, बोंबील, सोडे, कोळंबी, आंबाड, वाकटी, बांगड्याचा समावेश असतो. सुक्या मच्छीला चवीमुळे मागणीही अधिक असते. दरवर्षी लाखोंची उलाढाल सुक्या मच्छीच्या विक्रीतून होत असते. पण यंदा पावसाने अजून काढता पाय घेतलेला नसल्याने त्याचा परिणाम सुक्या मासळीच्या हंगामावर झाला आहे. अवकाळी पावसामुळे नवी मुंबई, उरण भागातील सुक्या मच्छीची आवक घटली आहे. हवामानातील बदलांमुळे समुद्रातील पारंपरिक मासेमारीवर मर्यादा आल्या आहेत. यामुळे सुक्या मच्छीची आवक कमी झाली आहे. - समुद्रातून मिळणाऱ्या माशांची आवक घटली आहे.

# आठव्या वेतन आयोगात सॅलरी होऊ शकते डबल?



केंद्र सरकारने आठव्या वेतन आयोगासाठी नियमावलीला हिरवा कंदिल दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आयोग आता अहवाल तयार करेल आणि पुढील १८ महिन्यांत तो सादर करेल. हा अहवाल मंत्रिमंडळाकडे पाठवला जाईल, जिथे पगार आणि निवृत्तिवेतन सुधारणांसाठी फिटमेंट फॅक्टर ला मंजुरी मिळेल.

फिटमेंट फॅक्टर म्हणजे पगार वाढवण्यासाठीचा गुणक.. सातव्या आयोगात तो २.५७ होता. नवीन आयोगात तो किती असेल, हे लवकरच कळेल. उदाहरणार्थ जर एखाद्या कर्मचाऱ्याचा सध्याचा मूळ पगार ३५,००० रुपये असेल आणि फिटमेंट फॅक्टर २.११ झाला, तर नवा मूळ पगार ७३,८५० रुपये होईल. घरभाडे भत्ता (एचआरए) सारखे भत्ते मूळ पगारावर आधारित असल्याने ते आपोआप वाढतील. वाहतूक भत्ता वेगळ्या पुनरावलोकनात सुधारला जाईल.

महागाई भत्ता (डीए) फिटमेंट फॅक्टर ठरवण्यात महत्त्वाचा भूमिका बजावतो. सध्याचा डीए ५८% आहे, तो ७०% पर्यंत वाढला तर सरकार 'ग्रोथ फॅक्टर' (मागील वेळी २४%) आणि कुटुंब युनिट (मागील ३, आता ४ असू शकते, म्हणजे १३% अतिरिक्त) विचारात घेते. डीए नवीन आयोगात शून्य होतो, त्यामुळे एकूण पगार २०-२५% वाढतो.

सर्व कर्मचाऱ्यांसाठी फिटमेंट फॅक्टर एकसमान असतो, जसे सातव्या आयोगात २.५७. पण कमी पगार गटांसाठी जास्त गुणक देऊन असमानता कमी करण्याची शक्यता आहे. उच्च पदावरील कर्मचाऱ्यांना पदोन्नती जास्त मिळते, त्यामुळे कमी स्तरांसाठी जास्त फिटमेंट आणि काही पातळ्या एकत्र करून पगार मॅट्रिक्स सोपी होऊ शकते. सध्या १८ पातळ्या आहेत.

जर फिटमेंट फॅक्टर २.० झाला तर ५०,००० रुपयांच्या मूळ पगाराचे १,००,००० रुपये होतील. पगार मॅट्रिक्समध्ये जवळच्या उच्च सेलमध्ये स्थान मिळेल. डीए, एचआरए, वाहतूक भत्ता नव्या मूळ पगारावर पुन्हा मोजले जातील. निवृत्तिवेतनधारकांनाही फायदा होईल. राऊंडिंगनंतर ३०,००० रुपयांच्या पेन्शनचे ६०,००० रुपये होऊ शकतात. लाखो कर्मचारी आणि पेन्शनर्सच्या आयुष्यात मोठा बदल येईल. आयोगाच्या शिफारशी लागू झाल्यास पगार दुप्पट होण्याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे

# पावसाच्या अडथळयामुळे भातखरेदीला विलंब

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**


**अलिबाग, ता. १ (वार्ताहर)** मेपासून सुरू झालेल्या पावसाने यंदा रायगड जिल्ह्यातील शेतीचे वेळापत्रकच विस्कळित केले आहे. ऑक्टोबरअखेरीसही पावसाचा मुक्काम कायम राहिल्याने शेतकऱ्यांचे भातपीक काढणीला विलंब होत आहे. परिणामी भातखरेदी केंद्रे उशिरा सुरू होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यात एकूण २८ भातखरेदी केंद्रे असून, यावर्षी भाताला प्रतिक्विंटल दोन हजार ३६९ रुपयांचा दर घोषित करण्यात आला आहे.

नोव्हेंबरअखेरीस ही केंद्रे सुरू होतील, अशी माहिती जिल्हा मार्केटिंग फेडरेशनचे अधिकारी के. टी. ताटे यांनी दिली. या वर्षी पावसाने मेच्या मध्यापासूनच हजेरी लावली. जूनमध्ये अल्प विश्रांती घेतल्यानंतर जुलै महिन्यात मुसळधार पाऊस झाला. काही भागांत शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली होती. पिके नुकतीच काढणीस तयार होत असतानाच ऑक्टोबर महिन्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला. परिणामी अनेक शेतकऱ्यांचे पीक ओलाव्यामुळे खराब झाले. सध्या शेतकरी उरलेले पीक वाचविण्याच्या प्रयत्नात असून, भात वाळविण्यासाठी उन्हाची प्रतीक्षा करीत आहेत. भातामध्ये अद्याप आर्द्रता असल्याने सुकवणी न झाल्यास भातखरेदी प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या सुरू करता येणार नाही. त्यामुळे जिल्ह्यातील खरेदी केंद्रांना उशिरा सुरुवात करावी लागणार आहे. सुरक्षित आणि दर्जेदार भात उपलब्ध झाल्यावरच टप्प्याटप्प्याने खरेदी केंद्रे सुरू करण्याचा फेडरेशनचा विचार

> **जिल्ह्यात २८ भातखरेदी केंद्रे कार्यान्वित होणार**
> **-----------**
> **भाताचा दर प्रतिक्विंटल २, ३६९ रुपये**
> **-----------**
> **ऑनलाइन नोंदणी लवकरच सुरू**
> **-----------**
> **नोव्हेंबरअखेरीस खरेदी केंद्रांना प्रारंभ**

आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी यावर्षीदेखील २८ केंद्रे कार्यरत राहणार असून, ती वाहतूक आणि साठवणुकीच्या दृष्टीने सोयीच्या ठिकाणी ठेवण्यात आली आहेत. शेतकऱ्यांना आपल्या भाताची विक्री शासकीय खरेदी केंद्रांवर करण्यासाठी ऑनलाइन नोंदणी करावी लागणार आहे. ही नोंदणी प्रक्रिया पुढील दोन ते तीन दिवसांत सुरू होईल, अशी माहिती के. टी. ताटे यांनी दिली. दरम्यान, पावसाचा अंमल कायम राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. नुकसानीतून सावरत असतानाच भातखरेदी उशिरा होणार असल्याने आर्थिक फटका बसू शकतो, असे मत स्थानिक शेतकरी व्यक्त करीत आहेत. तरीही शासनाने वेळेत खरेदी सुरू करून मदतीच्या उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## भविष्यवेध



रविवार
02 नोव्हेंबर 2025

**मेष**
धर्मात आस्था वाढेल. मार्ग प्रशस्त होईल. हुशारीने गुंतवलेले धन आपणास ध्येयाजवळ घेऊन जाईल. जोखिम असलेले कार्ये टाळा. जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये.

**वृषभ**
सामाजिक क्षेत्रात, ज्ञानवर्धक कामांमध्ये हजेरी द्यावी लागेल. नाते वाईकांशी भेट होईल. आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रीतीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

**मिथुन**
आरोग्य मध्यम राहील. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील. नाराजी दूर होईल.

**कर्क**
नवे काम, विचार, योजना लांबणीवर ठेवा. आर्थिक विवादातून नुकसान संभव. आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

**सिंह**
व्यापार उत्तम चालेल. सामाजिक कामात सक्रिय सहयोग मिळेल. मुलांच्या तब्बेतीची काळजी दूर होईल. दिवस नवी सुरुवात करण्यास किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय ठरावण्यास साहाय्यक असू शकतो.

**कन्या**
विशेष महत्वाच्या आर्थिक कामात भाग्यवर्धक यश. वित्तीय कामांसाठी विशेष यात्रा. गूढ अनुसंधान संबंधी कार्ये होतील. आवडीच्या नातलगांना भेटा व स्वतःबद्दल त्यांची प्रतिक्रिया मिळवा.

**तुळ**
आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. ज्या व्यक्तीकडे फुकट घालवण्यासाठी वेळ आहे त्याचे ऐकण्याचा प्रयत्न करा आणि त्याला सल्ला द्या. यश प्राप्ति होईल.

**वृश्चिक**
योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील. आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. आध्यात्मात मन रमेल. उत्पन्न वाढीबाबत योजना बनवू शकता.

**धनु**
गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो. मतभेद दूर होतील.

**मकर**
धार्मिक आयोजनात सहभागी व्हाल. भौतिक सुख प्राप्त होईल. विद्यार्थींच मन अभ्यासात रमेल. कौटुंबिक मतभेद दूर होतील.आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या.

**कुंभ**
योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. काम व इच्छित योजनेला अमलात आणण्याचे प्रयत्न करा. घरातील वातावरण आनंददायी राहील. सामाजिक कामात सहयोग मिळेल.

**मिन**
सामाजिक क्षेत्रात लाभ प्राप्तिचा योग. गूढ कार्यात यश प्राप्ति .सामाजिक क्षेत्रात धार्मिक अनुसंधानाचा योग. व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. प्रेमीजनांसाठी दिवस आनंदाने परिपूर्ण.



# बदलापुरात बाळासाहेब ठाकरेंचा पुतळा - आमदार किसन कथोरे यांची घोषणा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूरः** ज्या दिवशी कुळगाव बदलापूर नगरपालिकेत भाजपाचा नगराध्यक्ष विजयी होऊन जाईल, त्याच दिवशी बदलापुरात हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा भव्य पुतळा उभारण्यासाठी पहिला निर्णय घेऊ, अशी घोषणा भाजपचे मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी केली आहे. बाळासाहेबांच्या नावे कुणी पैसे खात असेल त्याच्याशी आम्हाला काही घेणे नाही, असे सांगत त्यांनी शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांना अप्रत्यक्ष टोला लगावला. पालिका निवडणुकीसाठी भाजपने कंबर कसली असून त्यानिमित्ताने



आमदार किसन कथोरे यांची ही घोषणा शिवसेनेला कोंडीत पकडण्यासाठी मोठी खेळी म्हणून पाहिली जाते.

यावेळी बोलताना त्यांनी शिवसेनेच्या स्थानिक नेतृत्वावर टीकाही केली. युतीमध्ये असल्याने आमच्यातही बाळासाहेब ठाकरे यांचे विचार रुजले आहेत. आम्ही बाळासाहेबांच्या विचारावर चालतो. मात्र त्यांच्या नावाने कुणी पैसे खात असेल तर आम्हाला त्याच्याशी घेणे नाही, असेही कथोरे यावेळी म्हणाले. यापूर्वी शिवसेनेचे वामन म्हात्रे यांनी सोनिवलीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकावरून किसन कथोरे यांच्यावर टीका केली होती. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकावर आधी बोला, असे प्रत्युत्तर आमदार कथोरे यांनी दिले होते. आता पुन्हा किसन कथोरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्याच्या घोषणेने म्हात्रे यांना खिंडीत पकडल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

### अनेक पुतळ्यांची घोषणा

आमदार किसन कथोरे यांनी बदलापुरात अनेक पुतळे उभारण्याची घोषणा केली आहे. छत्रपती संभाजी महाराज, सरदार वल्लभभाई पटेल, अटल बिहारी वाजपेयी, अण्णाभाऊ साठे यांचे पुतळे उभारण्याची घोषणा यावेळी त्यांनी केली. लवकरच बिरसा मुंडा यांचा पुतळा बसवला जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# ठाणे अंतर्गत मेट्रोचे बांधकाम लवकरच सुरु होणार ?

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाच ठाण्याच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर सहा डब्यांची मेट्रो गरजेची असल्याचे मत मांडले होते. केंद्र सरकारने हा मुद्दा मान्य करत सहा डब्यांच्या मेट्रोवर शिक्कामोर्तब करून प्रकल्पाला हिरवा कंदील दिला आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या ठाणे अंतर्गत रिंग मेट्रो प्रकल्पाचे बांधकाम नोव्हेंबर महिन्यापासून सुरू होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. ही मेट्रो २०२९ पर्यंत प्रवासी सेवेत दाखल होणार आहे.

या मेट्रोमुळे ठाणे शहराची वाहतूक व्यवस्था पूर्णपणे बदलणार असून, शहरातील प्रमुख व्यावसायिक आणि निवासी भागांना थेट जोडणी मिळणार आहे. या प्रकल्पामुळे ठाणेकरांचा प्रवास अधिक सुखकर आणि गतिमान होणार आहे. ठाणे अंतर्गत रिंग मेट्रो प्रकल्प २९ किमी लांबीचा असून हा प्रकल्प शहराच्या पश्चिम पट्ट्यात एक वर्तुळाकार मार्ग तयार करेल. वागळे इस्टेट, मानपाडा आणि ठाणे जंक्शनसारख्या गर्दीच्या भागांना जोडणाऱ्या या प्रकल्पाचे काम महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड मार्फत (महा मेट्रो) हाती घेणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने या १२,२०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाला ऑगस्ट २०२४ मध्ये हिरवा कंदील दिला.

महा मेट्रोनुसार, हा प्रकल्प ठाण्याच्या वाढत्या लोकसंख्येसाठी शाश्वत, स्वच्छ आणि कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक पर्याय ठरेल. यामुळे रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी होईल, इंधन बचत होईल आणि हरितगृह वायू उत्सर्जनात घट होईल. पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर, ही मेट्रो दररोज सुमारे ६.४७ लाख प्रवाशांना सेवा देईल अशी अपेक्षा आहे. या प्रकल्पासाठी निधी केंद्र आणि राज्य सरकारांकडून तसेच द्विपक्षीय वित्तीय संस्थांकडून मिळणार आहे.

**एकूण २९ किमी लांबीच्या या प्रकल्पात २६ किमी लांबीचा मार्ग हा उन्नत असून ३ किमीचा मार्ग हा भूमिगत आहे. प्रकल्पांर्गत एकूण २२ स्थानके असून त्यातील दोन स्थानके भूमिगत असणार आहेत. त्यातील एक भूमिगत स्थानक ठाणे रेल्वे स्थानकाला जोडले जाणार आहे. अन्य स्थानके शहरातील मेट्रो कॉरिडॉरला जोडली जाणार आहेत. अंदाजे ७.६१ लाख प्रवाशांना दररोज या मेट्रो रेल्वे सेवेचा लाभ होणार.**

**********************

**रायला देवी, वागळे सर्कल, लोकमान्य नगर बस डेपो, शिवाजी नगर, नीलकंठ टर्मिनल, गांधी नगर, डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात, मानपाडा, डोंगरीपाडा, विजयनगरी, वाघबीळ, पातलीपाडा, आझाद नगर बस स्टॉप, मनोरमा नगर, कोलशेत औद्योगिक क्षेत्र, बाळकुम नाका, बाळकुमपाडा, राबोडी, शिवाजी चौक, ठाणे जंक्शन, नवीन ठाणे अशी स्थानकांची नावे आहेत.**

# अधिकाऱ्यांची बदली होताच
## बेकायदा बांधकामांना उधाण

पान १ वरून ▶▶▶ त्रस्त झाले आहेत. दोन वर्षापूर्वी अ प्रभाग हद्दीत अधिक प्रमाणात बेकायदा चाळी, व्यापारी गाळ्यांची बांधकामे सुरू होती. ही बांधकामे जमीनदोस्त करावीत म्हणून तत्कालीन आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी नियमित अ प्रभागाचे तत्कालीन साहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांना सांगितले. पण, त्यांच्याकडून आक्रमक कारवाई होत नसल्याने संतप्त झालेल्या आयुक्त डॉ. जाखड यांनी साहाय्यक आयुक्त रोकडे यांना टिटवाळा परिसरातील बेकायदा बांधकामांना जबाबदार धरून निलंबित केले होते. त्यांच्या जागी साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांची तडकाफडकी नियुक्ती केली होती.

पदभार मिळताच साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी मागील वर्षभराच्या कालावधीत जुनी, नव्याने उभी राहत असलेली सुमारे पाच ते सहा हजाराहून अधिक बेकायदा चाळी, व्यापारी गाळ्यांची अ प्रभागाच्या तोडकाम पथकाच्या साहाय्याने जमीनदोस्त केली. शनिवार, रविवार सुट्टीच्या दिवशी, पावसाळ्यातही त्यांनी ही कारवाई सुरू ठेवली होती. या सततच्या कारवाईमुळे पाटील यांनी भूमाफियांचे कंबरडे मोडले होते. साहाय्यक आयुक्त पाटील यांच्या बदलीसाठी काही भूमाफियांनी राजकीय संबंधातून पालिका वरिष्ठांकडे प्रयत्न केले होते.

या सततच्या कारवायांमुळे आणि भूमाफियांचे आर्थिक कंबरडे मोडल्याने टिटवाळा परिसरातील जाणते नागरिक समाधानी होते. गेल्या महिन्यात पालिकेत १५४ अधिकाऱ्यांना पदोन्नत्या मिळाल्या. या पदोन्नत्ती प्रक्रियेमुळे अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या. या बदली प्रक्रियेत टिटवाळा अ प्रभागातील बेकायदा बांधकामांचे कर्दनकाळ म्हणून ओळखले जाणारे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांची ब प्रभागात कर अधीक्षक म्हणून बदली झाली. आता अ प्रभागात साहाय्यक आयुक्त म्हणून जयवंत चौधरी यांनी पदभार स्वीकारला आहे.

चौधरी प्रथमच साहाय्यक आयुक्त पदाचा पदभार सांभाळत आहेत. ते यापूर्वी डोंबिवलीतील फ प्रभागात अधीक्षक पदावर कार्यरत होते. चौधरी यांनी पदभार स्वीकारताच टिटवाळा, बनेली, बल्याणी, वडवली, आंबिवली, शहाड, वासुंद्री रस्ता भागात भूमाफियांनी मुख्य वर्दळीचे रस्ते, यापूर्वी तोडलेल्या बेकायदा चाळींच्या जागी दिवस रात्री कामे करून बेकायदा चाळी, व्यापारी गाळे उभारण्याची कामे सुरू केली आहेत. एकावेळी अ प्रभाग हद्दीत बेसुमार बेकायदा बांधकामे सुरू झाल्याने स्थानिक रहिवासी हैराण झाले आहेत. आयुक्त अभिनव गोयल, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त समीर भूमकर यांनी या प्रश्नात लक्ष घालण्याची टिटवाळा परिसरातील नागरिकांची मागणी आहे.

# ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांच्या हस्ते मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांचा सत्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (01):** मराठी भाषा अशा काळातून चालली आहे की, आपली साहित्य आणि संस्कृती कधी नव्हे ती धोक्याच्या रेषेवर गेली आहे, त्यामुळे आपल्या मराठी भाषेची काळजी आपण घेतली पाहिजे ती उराशी बाळगली पाहिजे. भाषा टिकली तरच संस्कृती टिकणार आहे, त्यासाठी आपली मराठी भाषा, मराठी शाळा, मराठी वाङ्मय वाचविण्यासाठी संघर्ष करायचा आहे, यासाठी महाराष्ट्रातील तालुक्यांमध्ये लोकसहभागातून किमान दोन ते तीन मराठी भवन उभारले गेले पाहिजे असे प्रतिपादन सातारा येथे होणाऱ्या 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी आज ठाण्यात केले.

ठाणे महानगरपालिकेच्यावतीने 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील




यांचा नागरी सत्कार कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. कार्यक्रमास राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ, ज्येष्ठ कवी अशोक बागवे, सतीश सोळांकुरकर, अभिनेते सागर तळाशीकर, कवी दुर्गेश सोनार, ज्येष्ठ अभिनेते नारायण जाधव, संवेदना प्रकाशनाचे नितीन हिरवे तसेच ठाण्यातील मान्यवर उपस्थित होते. मराठी भाषेचं संवर्धन करणे हा उठाव आहे आणि हा लोकांनीच पुढे नेला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत मराठी शाळा या बंद पडता कामा नये. मराठी शाळेतील कोणत्याही वर्गात एक विद्यार्थी असेल, तरी त्या विद्यार्थ्याला शिकवले पाहिजे. मराठी शाळेची तुकडी चालली पाहिजे. त्यातून संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर घडतील असे विश्वास पाटील यांनी नमूद केले.


# वालधुनी नदीच्या प्रदूषणातून मुक्तीसाठी ४१६ कोटींचा निधी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. १ (बातमीदार)**

जवळपास ३५ ते ४० वर्षांपूर्वी नितळ पाण्याने वाहणाऱ्या उल्हासनगरमधील वालधुनी नदीला जीन्स आणि केमिकल कारखान्यांमुळे प्रदूषणाचा शाप मिळाला होता. आता या शापातून नदीला बाहेर काढण्यासाठी महापालिकेने कंबर कसली असून, घाण पाणी शुद्ध करून नदीत सोडण्यासाठी चार मलशुद्धीकरण केंद्रे उभारण्यात आली आहेत.

ही केंद्रे कार्यान्वित झाली असून, आयुक्त तथा प्रशासक मनीषा आव्हाळे यांनी नुकताच या केंद्रांचा



पाहणी करून आढावा घेतला.

अमृत योजनेअंतर्गत ४१६ कोटी रुपयांच्या निधीतून वालधुनी नदीवर एकूण चार मलशुद्धीकरण केंद्रे उभारण्यात आली आहेत. त्यात वडोळ गाव २०.७२ दशलक्ष लिटरची क्षमता, शांतीनगर ३१.२६ दशलक्ष लिटर क्षमता, खेमानी नाला १५ दशलक्ष लिटर क्षमता आणि खेडेगोळवली आठ दशलक्ष लिटर क्षमता या मलशुद्धीकरण केंद्रांचा समावेश आहे. तसेच शांतीनगर येथे आणखीन एक मलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात येत असून, त्याचे काम प्रगतिपथावर आहे.

**चार मलशुद्धीकरण केंद्रे कार्यान्वित झाल्याने नदीतील घाण पाण्याचे शुद्धीकरण करून ते नदीत सोडले जाईल. येत्या काही वर्षात नदीचे रुपडे बदलण्याचा प्रयत्न महापालिका करणार आहे. नदीवर विसर्जन घाट, छटपूजा आणि इतर धार्मिक कार्यासाठी घाटांची बांधणीही केली जाणार आहे. या पाहणीदरम्यान उपायुक्त अनंत जवादवार, उपअभियंता परमेश्वर बुडगे आणि कन्सल्टंट जीवन बरबडे आदी उपस्थित होते.**

### नदीच्या पाण्याचा रंग बदलला

वालधुनी नदीचा उगम श्री मलंगगडाच्या पायथ्याशी होतो आणि ती अंबरनाथ, उल्हासनगर, शांतीनगरमार्गे कल्याणच्या खाडीपर्यंत प्रवास करते. ५० ते ४० वर्षांपूर्वी ही नदी नितळ पाण्याची होती आणि सहल तसेच मासेमारीसाठी ओळखली जात होती.

कालांतराने जीन्स कारखाने आणि केमिकल कारखान्यांमध्ये वाढ झाल्याने नदीतील नितळ पाण्याचे रूपांतर दूषित पाण्यात झाले. त्यामुळे नदीच्या पाण्याचा रंग हिरवा, पिवळा, गुलाबी आणि काळा असा बदलताना दिसतो.

# दुकाने आणि आस्थापनांवर मराठी फलके लावून घेण्याची जबाबदारी महापालिकेची
## - भिवंडी महापालिका उपायुक्त बाळकृष्ण क्षिरसागर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी:** भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात यंत्रमाग कारखान्यांसह, सायझिंग, डाईंग, मोती कारखाने, हॉटेल, किराणा मालाची दुकाने असे महानगरपालिकेकडे नोंदणीकृत ४१,५०० व्यावसायिक प्रतिष्ठाने आहेत. त्यापैकी अनेक आस्थापनांवर मराठी शिवाय इतर भाषेत आस्थापनांची (दुकानांची) फलके लिहिलेली असतात. तर अनेक ठिकाणी आस्थापनांच्या बाहेर फलकेच नसतात. अशा सर्व प्रकारच्या व्यावसायिक प्रतिष्ठानांवर मराठी फलके लावून घेण्याची जबाबदारी महापालिकेची असल्याची माहिती भिवंडी महानगरपालिकेचे उपायुक्त बाळकृष्ण क्षिरसागर यांनीं दिली.

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात रोजगार देणारे आणि नागरिकांना सेवा देणारी अनेक प्रतिष्ठाने आहेत. त्यापैकी महापालिकेच्या परवाना विभागात ४१,५०० प्रतिष्ठानांच्या नोंदी केलेल्या आहेत. या नोंदी करताना प्रतिष्ठानांची व्यावसायिकदृष्ट्या नोंदणी न केल्याने शहरातील एकूण व्यवसायाचा तपशील उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्यांना पालिकेच्या सुविधा मिळत नाहीच तर अशा व्यवसायाच्या ठिकाणी दुर्दैवाने अपघात अथवा दुर्घटना झाल्यावर त्याच्या नोंदी ताबडतोब उपलब्ध होत नसल्याने कारवाईस बाधा निर्माण होते.

भिवंडी शहरात अनेक ठिकाणी अनधिकृत इमारती आहेत. अशा अनधिकृत इमारतीमध्ये राजरोसपणे विविध व्यवसाय सुरु असतात. त्यापैकी काही व्यवसाय नागरिकांच्या आणि कामगारांच्या आरोग्यास घातक असतात. मात्र अशा अनधिकृत इमारतींवर कारवाई होत नाही. तसेच त्यामध्ये सुरु असलेल्या अवैध व्यवसायांवर देखील संबंधित कार्यालयाकडून कारवाई केली जात नाही. व्यवसायाच्या ठिकाणी प्रतिष्ठानाची फलके नसल्याने कारवाईस देखील बाधा निर्माण होते. महानगरपालिकेतील परवाना विभागाच्या अशा गलथान कारभाराचा पालिकेतील इतर विभागास देखील कारवाई करताना व्यवसायानुसार नोंदी नसल्याचा फटका बसत आहे. त्याचप्रमाणे पालिकेच्या महसुलावर देखील त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे महापालिका क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या अथवा सेवा देणाऱ्या व्यावसायिकांच्या त्यांच्या व्यवसायानुसार पालिकेच्या परवाना विभागात नोंदी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

महापालिकेच्या सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार गेल्या २-३ महिन्यापासून शहरातील विविध प्रतिष्ठानांचा सॅम्पल सर्वे सुरु असून या सर्वेमधून पालिकेचा महसूल वाढवीण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. विविध व्यावसायिक प्रतिष्ठानांच्या सर्वे साठी दिल्ली येथील सी.इ.इन्फो सिस्टम सर्व्हिसेस यांची नियुक्ती भिवंडी महापालिकेने केली असून या कंपनीस जॉइंट व्हेंचर म्हणून रिफ्लेट इंडिया सोल्युशन प्रा. ली.हे काम पहात आहेत. राज्य शासनाकडून कर्मचाऱ्यांची भरती होत नसल्याने तसेच भिवंडी महापालिकेत असलेल्या अधिकाऱ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचे नियोजन नसल्याने तर काही ठिकाणी कर्मचारीवर्ग कमी पडत असल्याने पालिकेच्या अनेक विभागात ठेकेदारांकडून काम केले जात आहे, असा आरोप शहरातील विविध समाज सेवकांकडून केला जात आहे. वास्तविक महापालिका सुरु झाल्यापासून व्यवसायानुसार नोंदणी अधिकाऱ्यांनी केली असती तर निश्चितपणे पालिकेचा महसूल वाढण्यास मदत झाली असती.

भिवंडी महानगरपालिकेतील नोंदीनुसार पालिका क्षेत्रात एकूण दोन लाख ७९ हजार मालमत्ता असून त्यापैकी ४१,५०० मालमत्तेत विविध प्रतिष्ठाने कार्यरत आहेत. मागील वर्षी सप्टेंबर २०२४ पर्यंत अभय योजना जाहीर करून सर्व प्रकारच्या मालमत्तेचे २४ कोटी उत्पन्न वसूल झाले होते.

मात्र या वर्षी सप्टेंबर २०२५ पर्यंत २६ कोटी उत्पन्न महापालिकेस झाले आहे. महापालिकेच्या परवाना विभागात कर्मचारीवर्ग कमी असल्याने शहरातील प्रतिष्ठानांची तपासणी होत नाही. राज्य शासनाच्या नियमानुसार मराठी फलके लावणे आणि प्रतिष्ठानांवर दंडनीय कारवाई करण्याकरिता या विभागात कर्मचारीवर्ग वाढविणे आवश्यक आहे. या साठी पालिकेकडून प्रयत्न केले जातील. त्यामुळे पालिकेचा महसूल वाढण्यास मदत होईल, असे उपायुक्त बाळकृष्ण क्षिरसागर यांनी सांगितले.

# मोहने येथे रुग्णालयाच्या पायरीवर डोके आपटून रहिवाशाचा खून

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण -** कल्याण मधील मोहने येथे गुरुवारी रात्री साडे आठ वाजण्याच्या दरम्यान मुंबईतील गोरेगाव येथे राहत असलेल्या एका ४० वर्षाच्या रहिवाशाचा गोरेगाव भागातच राहत असलेल्या एका तरूणाने मोहने येथील एका खासगी रुग्णालयाच्या पायरीजवळ डोके आपटून त्याला गंभीर जखमी करून जीवे ठार मारले. या खुनामागचे कारण समजू शकले नाही. आरोपीला ताब्यात घेतले आहे, अशी माहिती खडकपाडा पोलीस ठाण्याचे गुन्हे शाखेचे पोलीस निरक्षक एम. एस. आंधळे यांनी दिली.

या गुन्ह्यात मुंबईतील गोरेगाव येथे राहणाऱ्या मारिअप्पा राजू नायर (४०) यांचा मृत्यू झाला आहे. गोरेगाव येथे राहत असलेल्या गणेश रमेश पुजारी (२६) याने हा खून केला आहे. खडकपाडा पोलिसांना ही माहिती मिळताच पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, साहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे, गुन्हे विभागाचे पोलीस निरीक्षक एम. एस. आंधळे यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणातील आरोपीची कसून चौकशी करण्याचे आदेश दिले.

# ठाण्याच्या विकासासाठी तीन वर्षांत 3 हजार 900 कोटी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**ठाणे :** केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून ठाणे महापालिकेला गेल्या तीन वर्षांत कर्ज व विशेष अनुदान स्वरुपात मंजूर झालेल्या ६ हजार कोटींपैकी सुमारे ३ हजार ९०० कोटी रुपयांचा निधी खर्चही झाला. मात्र, प्रत्यक्षात ठाणेकरांना अजूनही प्राथमिक सुविधा मिळवितानाही संघर्ष करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर ३ हजार ९०० कोटी रुपयांचा खर्च नक्की कोठे झाला. त्यातून कोणती विकासकामे झाली, याची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी भाजपाचे माजी गटनेते नारायण पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

ठाणे महापालिकेला २०२२ पासून राज्य सरकारच्या माध्यमातून विशेष निधी म्हणून ६ हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले. त्यापैकी ३५०० कोटी रुपये पालिकेच्या तिजोरीत जमा झाले होते. त्याचबरोबर राज्य सरकारच्या माध्यमातून क्लस्टर प्रकल्पासाठी विशेष अनुदान म्हणून १४९ कोटी रुपये आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून २१३ कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज असे साधारण ३९०० कोटी रुपये उपलब्ध झाले. त्याआधी 'स्मार्ट सिटी'च्या माध्यमातूनही केंद्र सरकार व राज्य सरकारकडून शहरातील विविध प्रकल्पांसाठी निधी दिला गेला.

# हापूस आंब्यांची पेटी मुंबई बाजार समितीत दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबईः** वाशीतील एपीएमसी फळ बाजारात यंदा दिवाळीच्या दिवशी देवगडमधील हापूस आंबा दाखल झाला होता. हा आंबा पिकल्यानंतर या सहा डझनच्या पेटीला विक्रमी असा २५ हजार रुपये दर मिळाला आहे. आजवरचा हा सर्वाधिक उच्चांकी दर ठरला आहे, अशी माहिती येथील व्यापाऱ्यांनी दिली. दिवाळीच्या दिवशी देवगड तालुक्यातील पडवणे येथील आंबा बागायतदार प्रकाश शिर्सेकर यांची सहा डझन हापूस आंब्यांची पेटी मुंबई कृषी उत्पन्न बाजार येथील फळ मार्केटमध्ये दाखल झाली होती. वाशी येथील नानाभाऊ जेजुरकर अँड कंपनी यांच्याकडे या आंबापेटीची लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पूजा करण्यात आली होती लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आंबा पेटी दाखल होण्याची पहिलीच वेळ असल्याचे बाजार समितीतील व्यापारीवर्गाकडून सांगण्यात येत आहे. याआधीही, सुमारे पाच वर्षांपूर्वी नोव्हेंबर महिन्यात शिर्सेकर यांनी हापूस पेटी वाशी मार्केटला पाठवण्याचा मान मिळवला होता. मात्र, यावर्षी त्यांनी ऑक्टोबर महिन्यातच आंबा पेटी पाठवून दिवाळीचा मुहूर्त साधला होता, मात्र हा आंबा कच्चा असल्याने त्याची पूजा करून तो पिकण्यास ठेवला होता. हा आंबा पिकल्यानंतरच त्याची बोली लावली जाणार होती. त्यानुसार या आंब्याची बोली लागल्यानंतर या सहा डझन आंब्याच्या पेटीला विक्रमी दर मिळाल्याची माहिती व्यापारी हर्षल जेजुरकर यांनी दिली आहे. एपीएमसी बाजारात आजवर दाखल होणाऱ्या कोकणातील मुहूर्ताच्या हापूस आंब्याला २० ते २२ हजार रुपयांचा दर मिळाला होता. यंदा मात्र देवगडमधील आंब्याला २५ हजारांचा दर मिळाला.



ठाणे ■ रविवार
02 नोव्हेंबर 2025
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




# पडघा परिसरात अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान

**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**

**पडघा:** भिवंडी तालुक्यात अवकाळी पावसाने थैमान घातल्याने शेतकरी हतबल झाला आहे. तालुक्यातील पडघा, खालिंग, वांद्रे , दळेपाडा, सौर, पाच्छापूर, उबरखांड, नेवाडा, खातीवली, दहागाव, सारमाल, डोहोळे, भोकरी, कोशिंबी आदी भागात मुसळधार पावसामुळे भातशेती आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

उरलेसुरले भात काढत असतानाच कोसळलेल्या अवकाळी पावसामुळे परिपक्व अवस्थेतील भात पाण्यात भिजला आहे.

काही ठिकाणी तर उभ्या पिकालाही कोंब फुटले असून, भाताच्या ओंब्या झडून गेल्या आहेत. परिणामी शेतकऱ्यांच्या मेहनतीचा घाम पाण्यात वाहून गेला आहे. भिवंडी तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी भातशेतीवर अवलंबून आहेत. मात्र अवकाळी पावसामुळे भात पिकाचे संपूर्ण नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचा वर्षभराचा उदरनिर्वाह धोक्यात आला आहे. मजुरी आणि बियाण्याचा खर्चही निघत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या डोळ्यात अक्षरशः अश्रू तरळले आहेत.

महसूल आणि कृषी विभागाने तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत, अशी मागणी जोर धरू लागली आहे. ठाणे जिल्हाधिकारी तसेच जिल्हा कृषी अधीक्षक यांनी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## खोणीच्या सरपंचांनी साधला उध्दव ठाकरेंशी संवाद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** - डोंबिवली जवळील पलावा खोणी गाव ग्रुप ग्रामपंचायतीमधील नवनिर्वाचित सरपंच ज्योती विश्वास जाधव यांची शुक्रवारी सरपंच पदी नियुक्ती झाली. यावेळी ठाकरे गटाचे डोंबिवली विभागाचे जिल्हाध्यक्ष दीपेश पुंडलिक म्हात्रे यांच्या समन्वयाने पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी नवनिर्वाचित सरपंच जाधव यांना शुभेच्छा देण्यासाठी आणि नव्या जोमाने पक्ष विस्तार करण्यासाठी शिवसैनिकांना कामाला लागण्याच्या सूचना केल्या. उध्दव ठाकरे यांनी थेट सरपंचांशी संवाद साधल्याने ठाकरे गट शिवसैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांच्या मोबाईलवरून पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी नवनिर्वाचित सरपंच ज्योती जाधव यांच्याशी जाहीरपणे संवाद साधला. 'आपली निवड ही एका चांगल्या कामाची सुरूवात आहे. आता नव्याने जोमाने कामाला लागा. सर्व शिवसैनिकांनी केलेल्या प्रयत्नामुळे ही निवड झाली. त्यामुळे त्यांनाही शुभेच्छा सांगा,' असे उध्दव ठाकरे यांनी सरपंच जाधव यांना सांगितले. तसेच, जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांच्याशी संवाद साधून पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी आपण केलेल्या प्रयत्नामुळे ठाकरे गटाचा सरपंच खोणी ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी बसल्याबद्दल उध्दव ठाकरे यांनी समाधान व्यक्त केले.

खोणी गाव शिंदे शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जातो. यापूर्वीच्या या ग्रामपंचायतीमधील निवडणुका शिंदे शिवसेनेचे तालुकाप्रमुख महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली एकहाती झाल्या आहेत. खोणी गावच्या सरपंचपदी शिंदे शिवसेनेचा सरपंच बसेल अशी व्यवस्था वेळोवेळी शिंदे शिवसेनेकडून करण्यात आली. गेल्या महिनाभरापूर्वी शिंदे शिवसेनेचे गाव म्हणून शासनाचा एक भव्य उपक्रम खोणी गावात झाला होता. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती.

शिंदे शिवसेनेच्या गावात ठाकरे गटाचा सरपंच बसल्याची वार्ता सर्वदूर पसरताच, राजकीय वारे फिरले. नेहमीप्रमाणे दडपशशाही आणि रेटून राजकीय वातावरण बदलण्याची ताकद असलेले राजकीय नेते रिंगणात उतरले. आणि मग ठाकरे गटाचे पदाधिकारी खोणी गावातून बाहेर पडल्यावर नवनिर्वाचित सरपंच ज्योती जाधव यांनी आपणास सरपंचपदी विराजमान करण्यासाठी शिंदे शिवसेनेचे तालुकप्रमुख महेश पाटील यांची मोलाची साथ मिळाली. त्यांनीच वेळोवेळी आम्हाला मार्गदर्शन केले. यापुढे आम्ही त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करू, अशा प्रकारची प्रतिक्रिया समाज माध्यमांत प्रसारित करून ठाकरे गटाला शह दिला आहे. शिंदे शिवसेना आणि ठाकरे गटातील कुरबुरी खोणी गावातील सरपंच निवडीवरून उघड झाली आहे.

## मतदार याद्या दुरुस्त झाल्याच पाहिजे - बाळासाहेब थोरात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मतचोरी आणि मतदार याद्यांमधील घोळ याबाबत निवडणूक आयोगाचा निषेध करण्यासाठी आज मुंबईत सर्वपक्षीय महामोर्चा काढण्यात आला होता. काँग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी मोर्चात सहभागी सर्वपक्षीय कार्यकार्त्यांना संबोधित केले. यावेळी मतदार याद्या दुरुस्त झाल्याच पाहिजे अशी जोरदार मागणी बाळासाहेब थोरात यांनी केली. आपल्या देशाची लोकशाही, राज्यघटना वाचवण्यासाठी आजचा लाखोंचा जनसमुदाय, सत्याचा मोर्चा येथे आलेला आहे. आजचा मोर्चा हा अभूतपूर्व आहे. केंद्रीय निवडणूक आयोग, राज्य निवडणूक आयोग आणि निवडणूक आयोगाला चालवणाऱ्या सत्तांविरोधात हा मोर्चा आहे, असे थोरात म्हणाले.

राहुल गांधी यांनी दाखवून दिलं की देशाच्या निवडणुका मतचोरीतून होतायत. राहुल गांधी हे देशाचे विरोधी पक्षनेते आहेत. त्यांनी मुद्दा उपस्थित केल्यानंतर केंद्रीय आयोगाने थातूरमातूर उत्तर दिलं. केंद्रीय निवडणूक आयोगाचं उत्तर देशातील सर्वात बोगस उत्तर म्हणून नोंदलं जाईल. त्यांनी खुलासा, चौकशी केली नाही. त्यावेळी असं लक्षात आलं की महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुका सुद्धा अशाच पद्धतीने बोगस पद्धतीने बोगस मतदार यादीवर झालेल्या आहेत.

विधानसभेच्या मतदार यादीवर कोणत्याही हरकतीवर निर्णय न घेता त्यांनी 1 जुलै रोजी ती राज्य निवडणूक आयोगाच्या ताब्यात देण्यात आली. आम्ही निवडणूक आयोगाकडे गेलो आणि विधानसभेच्या वेळी वापरलेली मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांना वापरू नका असं त्यांना सांगितलं. आम्ही सर्वजण दोन्ही निवडणूक आयोगाला भेटलो. केंद्रीय निवडणूक आयोगाला भेटलो पण ते उत्तर देऊ शकले नाही. राज्य निवडणूक आयोगाकडे गेलो ते उत्तर देऊ शकले नाही, असे बाळासाहेब थोरात पुढे म्हणाले.

## भिवंडीच्या कशिवली गावला मुंबई महापालिकेकडून पाणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी:** भिवंडी तालुक्यातील धामणगाव-कशिवली गावातील ग्रामस्थांना मुंबई महापालिकेकडून पाणीपुरवठा करण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. कशिवली गावाला पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्याकडून प्रयत्न केले जात होते.

भिवंडी तालुक्यातील धामणगाव-कशिवली ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कशिवली ग्रामस्थांना पिण्याचे पाणी उपलब्ध होत नव्हते. या गावाजवळून मुंबई महापालिकेची पाईपलाईन जात होती. मुंबई महापालिकेने तालुक्यातील इतर गावांप्रमाणेच कशिवलीलाही पाणीपुरवठा करावा, यासाठी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्याकडून मुंबई महापालिकेच्या आयुक्तांकडे पाठपुरावा केला जात होता. या संदर्भात १२ मे २०२१ रोजी पत्र देण्यात आले होते. तसेच मुंबई महापालिकेचे तत्कालीन आयुक्त आय. एस. चहल यांच्याबरोबर संवाद साधला होता. त्यानंतर याबाबत प्रक्रिया सुरू करण्यात आली होती.

अखेर महापालिकेने धामणगाव कशिवली ग्रामपंचायतीला नुकतेच पत्र पाठवून नवीन तानसा जलवाहिनीवरुन ३२ मिमी व्यासाची जलजोडणी देऊन पाणीपुरवठा करण्यासाठी मंजुरी दिली आहे.

कशिवली येथील पाण्याचा प्रश्न सोडविल्याबद्दल ग्रामस्थ संदेश भोईर, ज्ञानेश्वर पाटील, यशवंत पाटील, सुंदर पाटील, किरण भोईर, जगन पाटील, अनिल पाटील यांच्यासह ग्रामस्थांनी कपिल पाटील यांची भेट घेऊन आभार मानले. त्यावेळी धामणगाव-कशिवली ग्रामस्थांच्या कायम पाठीशी उभा राहणार असल्याची ग्वाही कपिल पाटील यांनी दिली. या वेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य देवेश पाटील यांचीही उपस्थिती होती.

## शहाड उड्डाणपुलाचा त्रासदायक प्रवास अखेर संपणार

### आमदार कुमार आयलानी यांच्या पाठपुराव्याला यश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर, ता. १ (वार्ताहर)** कल्याण- शहाड- उल्हासनगर- मुरबाड महामार्गावरील शहराच्या जीवनवाहिनीप्रमाणे असलेल्या शहाड उड्डाणपुलाचा त्रासदायक प्रवास अखेर संपणार आहे. अनेक महिन्यांपासून तडे गेलेला आणि खड्ड्यांनी व्यापलेला हा पूल लवकरच नव्या डांबरी लेपाने चकाकणार आहे. आमदार कुमार आयलानी यांनी डांबरीकरणासाठी पाठपुरावा केला होता. आता पुलाच्या डांबरीकरणाचे काम ३ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून, ते २३ नोव्हेंबरपर्यंत म्हणजेच अवघ्या २० दिवसांत पूर्ण होईल, अशी अधिकृत माहिती समोर आली आहे.

दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या पुलाच्या दुरुस्तीसाठी अनेक बैठका आणि पत्रव्यवहारानंतर १३ ऑक्टोबर रोजी बेअरिंग बदलण्याचे काम पूर्ण झाले होते. दिवाळीत वाहतुकीला अडथळा नको म्हणून रस्त्याचे काम पुढे ढकलण्यात आले होते. आता या कामासाठी ठाणे वाहतूक विभागाचे उपायुक्त पंकज शिरसाट यांनी परवानगी दिली असून, ३ नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

### वाहतूक नियम

**■ शहाड पुलावर एका लेनवर फक्त बाइक, ऑटो आणि चारचाकी वाहनांची वाहतूक सुरू राहील.**

**■ मोठ्या वाहनांना पुलावर पूर्णतः बंदी घालण्यात येणार आहे.**

**■ उल्हासनगर ट्रॅफिक विभागाचे निरीक्षक राजेश शिरसाठ यांनी ही माहिती दिली. कामाच्या काळात नागरिकांना गैरसोय होऊ नये म्हणून वाहतूक पोलिस दलाची विशेष पथके तैनात केली जाणार आहेत.**

---

शहाड पुलाच्या आधीच्या रस्त्यावरील जुने साहित्य पूर्णतः काढून त्यावर नवीन डांबराची मजबूत लेयर टाकून टिकाऊ रस्ता तयार करण्याची मागणी आम्ही केली होती. हा प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने मंजूर केला असून, त्यामुळे रस्त्याची टिकाऊपणा आणि दर्जा दोन्ही कायम राहतील. आमदार आयलानी आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेश शिरसाठ यांनी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून हे काम वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण होईल.

**■ आमदार कुमार आयलानी**

## त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री दिसणार सुपर मून

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे:** येत्या बुधवारी ५ नोव्हेंबर रोजी, त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री आकाशात सुपर मून दिसणार असल्याचे पंचांगकर्ते खगोल अभ्यासक दा.कृ.सोमण यांनी सांगितले. याविषयी अधिक माहिती देताना श्री. सोमण म्हणाले की, पौर्णिमेच्या दिवशी जर चंद्र पृथ्वीच्या जवळ असेल तर चंद्रबिंब जास्त मोठे आणि जास्त तेजस्वी मनोहारी दिसते. तसे ते बुधवारी ५ नोव्हेंबर रोजी रात्री दिसणार आहे.

चंद्र पृथ्वीपासून सरासरी तीन लक्ष ८४ हजार किमी अंतरावर असतो. या दिवशी तो पृथ्वीपासून तीन लक्ष ५६,८३४ किमी अंतरावर येणार आहे. पौर्णिमेच्या दिवशी जर चंद्र पृथ्वीपासून दूर असेल तर चंद्रबिंब लहान आणि कमी तेजस्वी दिसते. याला मायक्रो मून म्हणतात. सुपर मून हा मायक्रो मूनपेक्षा १३ टक्के मोठा आणि ३० टक्के जास्त तेजस्वी दिसतो. तसा तो बुधवारी ५ नोव्हेंबर रोजी रात्री दिसणार आहे.

बुधवारी ५ नोव्हेंबर रोजी सुपर मून सायंकाळी ५.४४ वाजता पूर्वेला उगवेल आणि रात्रभर सुंदर दर्शन देईल. या पुढील सुपर मून पुढच्याच महिन्यात गुरूवार ४ डिसेंबर रोजी दत्तजयंतीच्या रात्री दिसणार असल्याचे श्री. दा.कृ.सोमण यांनी सांगितले.

## डोंबिवलीत रिक्षेमधून मांसाची तस्करी ठाकुरवाडीतील दोघांविरुध्द गुन्हा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** काटई - बदलापूर पाईपलाईन रस्त्यावरील हेदुटणे गाव हद्दीतील ईवा शाळेसमोर आणि नानाचा ढाबा समोरील सार्वजनिक रस्त्यावर एका जागरूक नागरिकाच्या तक्रारीवरून मानपाडा पोलिसांनी रिक्षेतून नेण्यात येत असलेले एका प्राण्याच्या जातीचे मांस पकडले आहे. ते ४७ हजार रूपये किमतीचे आहे. मानपाडा पोलिसांच्या सूचनेवरून पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी या मांसाचे तुकडे ताब्यात घेऊन ते कोणत्या प्राण्याचे मांस हे प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहे.

मोहम्मद अब्दुल अझीज अली शेख (५०), सुरैया मोहम्मद अझीझ अली शेख (४५) अशी या पती पत्नीची नावे आहेत. ते डोंबिवली पश्चिमेतील ठाकुरवाडी भागात राहतात. हवालदार नाना खंडू जाधव यांनी याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलीस ठाण्यातील माहिती, अशी काटई बदलापूर रस्त्यावर नाना ढाबा परिसरात सार्वजनिक रस्त्यावर एका रिक्षेतून एका प्राण्याचे मांस विक्रीसाठी नेण्यात येत असल्याची माहिती या भागातील एक जागरूक नागरिक सुरज प्रजापती यांनी मानपाडा पोलिसांना दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली.

रिक्षेत एका पिशवीत प्राण्याचे मांस आणि एक महिला आणि एक पुरूष बसले होते. अनेक लोक या रिक्षे भोवती जमा झाले होते. पोलिसांनी त्यांची ओळख पटवली. हे मांस आपण मुंब्रा येथील वसीम यांच्याकडून आणले असल्याची माहिती या दाम्पत्याने पोलिसांना दिली.

हे मांस आपण कुठे नेणार होता आणि त्याची कोणाला विक्री करणार होती या पोलिसांच्या प्रश्नावर जोडप्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. बेकायदेशीरपणे ही प्राण्यांच्या मांसाची तस्करी असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. घटनास्थळी ऋषिकेश माळी, रायबा हजारी, सुरज प्रजापती हे जागरूक नागरिक उपस्थित होते. ४७ हजार रूपये किमतीचे हे मांस आहे.

## जि.प. सहाय्यक प्रशासन अधिकारी कल्पना तोरवणे यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (दि. 01 नोव्हेंबर 2025)** — जिल्हा परिषद ठाणे येथील सामान्य प्रशासन विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी कल्पना तोरवणे यांच्या सेवापूर्ती निमित्त दि. ३१ ऑक्टोबर, २०२५ रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे यांच्या हस्ते तोरवणे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित राहून अधिकारीवर्ग आणि सहकाऱ्यांनी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी आपल्या भाषणात कल्पना तोरवणे यांच्या शिस्तप्रिय व कार्यतत्पर वृत्तीचे कौतुक करत त्यांच्या सेवाभावाचे विशेष उल्लेख केले. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांनी त्यांच्या काटेकोर कामकाज व सकारात्मक दृष्टिकोनाबद्दल प्रशंसा व्यक्त केली.

कल्पना तोरवणे यांनी सन 1998 पासून जिल्हा परिषद सेवेत राहून विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. त्यांनी प्रशासनात शिस्त, काटेकोरपणा आणि कार्यतत्परता राखत आपल्या कामाद्वारे अनुकरणीय आदर्श निर्माण केला. सेवेत असताना त्यांनी विधी शाखेची पदवी तसेच पत्रकारितेची पदविका प्राप्त करून शिक्षणाला वयाचे बंधन नसते हे दाखवून दिले.

त्यांच्या कार्यकाळात त्यांनी प्रशासनातील गुणवंत कर्मचारी म्हणून जिल्हा परिषदेचा कर्मचारी गौरव पुरस्कार प्राप्त केला आहे. त्यांच्या दीर्घ सेवेत त्यांनी संघटनेच्या आणि विभागाच्या प्रगतीसाठी दिलेले योगदान लक्षणीय ठरले आहे.

तोरवणे यांच्या कुटुंबीयांचा सहवास व साथ त्यांच्या यशामागे महत्त्वाची ठरली आहे. जिल्हा परिषद ठाणे परिवाराच्या वतीने त्यांना सेवानिवृत्तीनंतरचा काळ सुख, समाधान, आरोग्य आणि आनंदाने परिपूर्ण जावो, अशा शुभेच्छा देण्यात आल्या.

## भाताचा हमीभाव क्विंटलमागे तुटपुंज्या दराने वाढ - शेतकऱ्यांमध्ये नाराजी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

एकीकडे अवकाळी पावसाने रायगडातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असतानाच केंद्र सरकारनेदेखील बळीराजाच्या तोंडाला पाने पुसली आहेत. भाताचा हमीभाव यंदा क्विंटलमागे फक्त ६८ रुपयांनी वाढवला असून अद्याप भात खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आलेली नाही. त्यामुळे हमीभाव जाहीर केला असला तरी भाताची खरेदी करणार तरी कोण, असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला आहे.

यावर्षी सरकारने प्रतिक्विंटल २ हजार ३६९ रुपये एवढाच हमीभाव जाहीर केल्याने संताप व्यक्त होत आहे. गेल्या वर्षीच्या खरीप हंगामासाठी केंद्र सरकारने क्विंटल मागे २ हजार ३०० रुपये एवढा भाव दिला होता. तो यावर्षी अतिशय तुटपुंज्या प्रमाणात वाढवला आहे.

भाताची खरेदी करताना आर्द्रतेच्या निकषांचे काटेकोरपणे पालन करावे लागणार आहे, पण लांबलेल्या पावसाने शेतकरी हवालदिल आहे. सामान्य 'ए' श्रेणीच्या भातामध्ये आर्द्रतेचे प्रमाण जास्तीत जास्त १६ टक्क्यांपर्यंत मान्य केले आहे. या मर्यादेपेक्षा जास्त आर्द्रता असलेले भात खरेदीस पात्र नसल्याने दरात कपात करून तो विकावा लागतो. या अटीमुळेही येथील शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मळणी केलेले भात उन्हात वाळवावे लागणार आहे, यासाठी जादा मनुष्यबळ आणि दिवस लागणार असल्याने खर्चाचा बोजा वाढणार आहे.

यंदा मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे पेरणीपासूनच भातपिकाच्या अडचणी सुरू झाल्या त्या अद्याप संपलेल्या नाहीत. नुकसानीचे पंचनामे, तुटपुंजा हमीभाव, विक्री केंद्र सुरू होण्यास विलंब झाल्याने शेतकरी अडचणीत सापडण्याची भीती व्यक्त होत आहे. गेल्या वर्षी ६ लाख ३५ हजार ७५८ क्विंटल इतकीच खरेदी मार्केटिंग फेडरेशनला करता आली.

भातपिकाची वेळेत पेरणी न झाल्याने रोपांचा तुटवडा जाणवत होता. यामुळे दरवर्षीच्या सरासरीपेक्षा २५ टक्क्यांनी शेती लागवड कमी झाली आहे.






## संविधानाने दिलेला अधिकार जतन करण्याची वेळ आली - शरद पवार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** लोकशाहीच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याची वेळ आली असून, सर्वांनी एकजूट दाखवावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांनी केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घोळ समोर आला आहे. याच मुद्द्यावरून विरोधी पक्षांनी मुंबईत निवडणूक आयोगाविरोधात जोरदार मोर्चा काढला. मतदार याद्या दुरुस्त झाल्याशिवाय निवडणुका घेऊ नयेत, अशी आग्रही मागणी विरोधकांनी केली. यावेळी बोलताना पवार यांनी संविधानाने दिलेल्या अधिकारांचे जतन करण्यावर भर दिला.

### भाषणात ऐतिहासिक संदर्भ


मोर्चात सहभागी झालेले शरद पवार आपल्या भाषणात ऐतिहासिक संदर्भ देत म्हणाले, "आजचा हा मोर्चा पाहून जुन्या गोष्टी आठवण करून देतात. १९७८ साली महाविद्यालयात शिकत असताना संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी असे मोर्चे निघाले होते. आज सर्वांनी दाखवलेली एकजूट त्या चळवळीची आठवण करून देते. आपण स्वतःसाठी काहीही मागत नाही. लोकशाहीत संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार जतन करण्याची वेळ आली आहे."

### विश्वासाला धक्का बसला

शरद पवार पुढे म्हणाले, "नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये घडलेले प्रकार पाहता सामान्य माणसाच्या संविधानावरील विश्वासाला धक्का बसला आहे. अनेक ठिकाणी लोक अस्वस्थ आहेत. सोलापूरचे उत्तमराव जानकर यांनी त्यांचा अनुभव सांगितला. यातून स्पष्ट होते की सत्तेचा गैरवापर होत आहे. निवडणुकीत संघर्ष होऊ शकतो, पण मतांचा आदर आणि लोकशाही जतन करणे हा आपला मूलभूत अधिकार आहे."

### बनावट आधार कार्ड वापरून मतदार याद्या

विरोधकांच्या तक्रारीनुसार, काही ठिकाणी बनावट आधार कार्ड वापरून मतदार याद्या बदलल्या जात आहेत. तक्रारदारांनी कलेक्टरसमोर पुरावे सादर केल्यानंतरही त्यांच्यावरच गुन्हे दाखल होत आहेत. पवार म्हणाले, "याचा अर्थ शासन या सर्व प्रकारांना पाठिंबा देत आहे. मतदार याद्यांतील त्रुटी दूर करणे ही आपली जबाबदारी आहे. आम्ही वेगवेगळ्या पक्षांचे आहोत, विचारधारा वेगळ्या आहेत; पण देशाची संसद आणि मतदानाचा अधिकार टिकवायचा असेल तर सर्वांनी एकत्र यावे."




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024